# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २५/०३/२०१७

मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्रि करणाऱ्या या व्यवसायीकांवर आळा घालण्याकरीता अवैध दारु रेडसंबंधाने स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी सोपविले. जबाबदारी पार पाडतांना पोलीस निरीक्षक यशवंत नलावडे, स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक २४/०३/२०१७ रोजी पोलीस पोउपनि सुनिल इंगळे, सोबत स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील पोकर्म वाळके, चवारे, नरोटे, तावाडे, पातकमवार असे गडचिरोली शहरात प्रोव्हिबिशन गस्तीवर कार्यरत असतांना स्थानिक गोपनिय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीचे आधारे पोलीस पथक हे आय. टि. आय. ते गोकुळनगर बायपास रोड दरम्यान पुलीयाचे बाजुला सापळा रचुन बेकायदेशीर दारु वाहतुक करणारे चारचाकी वाहणावर पाळत ठेवून बसले असतांना दुपारी १४.०० वाजता सुमारास एक पांढऱ्या रंगाचे महिंद्रा बोलेरो चारचाकी वाहन चालक हा त्याचे ताब्यातील चारचाकी वाहन हे सदर रोड दरम्यान असलेल्या पुलीयाचे बाजुला लावून चारचाकी वाहनात असलेल्या विदेशी दारुचे सिलबंद बॉक्स खाली करीत असल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस पथक हे वाहनाजवळ पोहचताच वाहन चालकास पोलीसांच्या हालचालीचा संशय आल्याने वाहन चालक हा वाहनासह पळून गेला.

घटनास्थळी पाहाणी केली असता, किंमत १,५८,४००/- रुपये किंमतीचे इंपेरियल ब्ल्यु व्हिस्की कंपणीच्या छ.ग. राज्य निर्मीत प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या विदेशी दारुच्या एकुण ५२८ सिलबंद निपा मिळून आल्यात. घटनास्थळी मिळून आलेला विदेशी दारुचे मालकी हक्कासंबंधाने तसेच बेकायदेशिररित्या विदेशी दारुचे वाहतुक करुन चारचाकी वाहनासह घटनास्थळावरुन पळून गेलेल्या इसमाबाबत माहिती घेतली असता, वर नमुद वर्णनाची विदेशी दारु हि मौजा गोकुळनगर गडचिरोली येथील अवैध दारु विक्रेता नामे आबिद सादिक शेख यास पुरविली असून त्यांचे सोबत अवैध दारु विक्री संबंधाने संगणमत करुन दारुचा पुरवठा करणारा घटनास्थळावरुन वाहनासह पळून गेलेला इसम हा मौजा कुरखेडा येथील अवैध दारु पुरवठा करणारा नामे शहजाद शेख असून त्याने त्याचे ताब्यातील महिंद्रा बोलेरो कंपणीचे चारचाकी वाहन बेकायदेशिर दारु वाहतुककरीता वापरले असल्याचे खात्रीशिर समजल्याने यातील पाहिजे आरोपीतांविरुध्द पोस्टे गडचिरोली येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडून होत असलेल्या कारवाईमुळे गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्रेते तसेच बेकायदेशीर दारुचा पुरवठा करणारे इसम धस्तावलेले आहेत.


IMPERIAL BLUE
WHISKY
TRADITION
BLENDED AND BOTTLED BY: PERNOD RICARD INDIA (P) LTD.
Batch No. [redacted]
Mfg. Date [redacted]